# स्टडी सर्कल करिअर डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट

# चालू घडामोडी घटकाची तयारी व मार्गदर्शन

## अभ्यासक्रमातील महत्त्वाचे घटक

* जग, राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावरील महत्त्वाच्या घटना –

१) चालू घडामोडी : राजकीय क्षेत्र व प्रशासन
२) चालू घडामोडी : आर्थिक व वित्त क्षेत्र
३) चालू घडामोडी : आरोग्य, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्र
४) चालू घडामोडी : भौगोलिक व पर्यावरण
५) चालू घडामोडी : सामाजिक, ऐतिहासिक घटना
६) चालू घडामोडी : क्रीडा क्षेत्र
७) पुस्तके, कला व दिनविशेष
८) नेमणुका व व्यक्तीविशेष
९) पुरस्कार
१०) सामान्यज्ञान

## १) चालू घडामोडी : राजकीय क्षेत्र व प्रशासन

१) विधान परिषदेवरील नियुक्तीबाबत खालीलपैकी कोणते विधान *चुकीचे* आहे?
१) घटनेच्या १७१(५) कलमानुसार राज्यपाल हा एकूण जागांच्या १/६ जागा नामनियुक्त करू शकतात.
२) घटनेच्या १६३ व्या कलमानुसार राज्यपाल प्रत्येक गोष्ट मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने करतात.
३) बिमानचंद्र बोस विरुद्ध एच. सी. मुखर्जी या कोलकाता उच्च न्यायालयातील खटल्यातील निकालानुसार विधान परिषदेवर नामनियुक्त करण्याचा अधिकार पूर्णपणे मंत्रिमंडळाला आहे.
४) विद्यासागर विरुद्ध वल्लभ सहाय या पाटणा उच्च न्यायालयातील खटल्यातील निकालानुसार, नामनियुक्त सदस्य हा राज्यपालांचा विशेष अधिकार आहे.

२) खालील विधाने लक्षात घ्या :
अ) १९२३ मध्ये लीग ऑफ नेशन्सने 'हेल्थ ऑर्गनायझेशन'ची सुरुवात केली होती.
ब) या हेल्थ ऑर्गनायझेशनने प्लेगची आंतरराष्ट्रीय साथ रोखण्यासाठी एक नवीन प्रणाली तयार केली.
क) १९४८ मध्ये वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनची स्थापना झाली.
वरीलपैकी कोणते कथन *अयोग्य* आहे ?
**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) वरीलपैकी नाही

३) या दिवशी ब्रिटन अधिकृतपणे युरोपियन समुदायापासून विभक्त झाल्याने 'ब्रेग्झिट' समर्थकांनी लंडनच्या 'पार्लमेंट स्क्वेअर'वर येऊन आनंदाने जल्लोष केला, तर विरोधकांनी निषेध करून विरोध दर्शविला.

१) १२ डिसेंबर २०१९ २) ११ जानेवारी २०२० ३) १ फेब्रुवारी २०२० ४) १० मार्च २०२०

४) संयुक्त महाराष्ट्र चळवळीबाबत खालीलपैकी कोणते विधान *बिनचूक* आहे?

अ) पंडित नेहरूंनी सूचविलेल्या मुंबई राज्य ऐवजी आचार्य अत्रे व बॅरिस्टर नाथ पै यांनी महाराष्ट्र या नावाचा आग्रह धरला.

ब) द्वैभाषिक मुंबई राज्यातील एकूण ४३ जिल्ह्यापैकी २६ जिल्हे मराठी भाषिक होते.

क) महाराष्ट्रविरोधी दिल्लीतील काँग्रेसला महाराष्ट्र काँग्रेसच्या देवकिनंदन नारायण, शंकरराव देव आणि देवगिरीकर या तीन तीन 'डी' नी विरोध केला होता.

ड) कामगार दिनाच्या दिवशी 'प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णू विश्ववंदिता महाराष्ट्रस्य राज्यस्य मुद्रा भद्राय राजत' ही राज्यमुद्रा स्वीकारण्यात आली.

**पर्यायी उत्तरे** :

१) अ, ब, क, ड २) ब, क आणि ड ३) अ, क आणि ड ४) अ आणि ड

५) २४ एप्रिल २०२० या पंचायत राज दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सुमारे २. ५० लाख सरपंचांशी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधताना कोणत्या योजनेचा शुभारंभ केला ?

१) ई ग्राम स्वराज २) स्वामित्व योजना ३) ई ग्राम पंचायत ४) १ आणि २

६) ***योग्य*** कथन/ने ओळखा.

अ) संयुक्त राष्ट्रसंघाने शाश्वत विकासाची उद्दिष्टे वर्ष २०१५ मध्ये एकूण १७ उद्दिष्ट्येमांडली.

ब) त्यातील ८.७ या उद्देशानुसार जबरदस्ती मजुरांचे होणारे शोषण, आधुनिक गुलामगिरी, अनैतिक मानवी वाहतूक आणि बाल कामगार प्रथेचे वर्ष २०३० पर्यंत उच्चाटन करणे ही उद्दिष्ट्ये आहेत.

पर्यायी उत्तरे :

१) फक्त अ २) फक्त ब ३) अ आणि ब दोन्ही ४) अ आणि ब दोन्ही नाही

७) खालील बहु-उद्देशिय प्रकल्पांच्या जोड्या लावा:

| कॉलम *I* | कॉलम *II* |
|---|---|
| अ) हिंगोली जिल्हा | i. १ मे १९९९ |
| ब) गडचिरोली जिल्हा | ii. २६ ऑगस्ट १९८२ |
| क) वाशिम जिल्हा | iii. १ जुलै १९९८ |
| ड) मुंबई उपनगर | iv. १ ऑक्टोबर १९९० |

**पर्यायी उत्तरे** :

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| १) | ii | iv | i | iii |
| २) | iv | ii | i | iii |
| ३) | iv | ii | iii | i |
| ४) | i | ii | iii | iv |

८) सध्याच्या महाराष्ट्र विधानसभेत या पक्षांचे आमदार कार्यरत आहेत ?

अ) क्रांतिकारी शेतकरी पक्ष ब) राष्ट्रीय समाज पक्ष

क) प्रहार जनशक्ती ड) बहुजन विकास आघाडी

**पर्यायी उत्तरे** :

१) अ, ब, क आणि ड २) अ, ब आणि क

३) अ, क आणि ड ४) ब आणि क

९) खालील बहु-उद्देशिय प्रकल्पांच्या जोड्या लावाः

| कॉलम *I* | कॉलम *II* |
|---|---|
| अ) सोलापूर महानगरपालिका | i. अ वर्ग |
| ब) नागपूर महानगरपालिका | ii. ब वर्ग |
| क) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका | iii. क वर्ग |
| ड) वसई-विरार महानगरपालिका | iv. ड वर्ग |

**पर्यायी उत्तरे :**

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| १) | ii | iv | i | iii |
| २) | iv | ii | i | iii |
| ३) | iv | i | ii | iii |
| ४) | i | iii | iv | ii |

१०) 'अम्ब्रेला मूव्हमेन्ट' ही .......... देशाशी संबंधित आहे.

१) युनायटेड २) युनायटेड किंगडम ३) हाँगकाँग ४) स्वीडन

११) १२६ वे घटनादुरुस्ती विधेयक २०१९ बाबत खालीलपैकी कोणते विधान *चुकीचे* आहे?

१) हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात साध्या बहुमताने म्हणजेच हजर राहून मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने मंजूर झाले आहे.

२) या विधेयकाने लोकसभा आणि विधानसभांमधील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी असलेला राखीव जागांचा हिस्सा आणखी पुढील १० वर्षांसाठी वाढविण्यात आला.

३) या विधेयकाने अँग्लो-इंडियन जमातीसाठी असलेला राखीव जागांचा हिस्सा वाढविण्याची शिफारस केलेली नाही ज्याची मुदत २५ जानेवारी २०२० रोजी संपलेली आहे.

४) वरीलपैकी एकही नाही

१२) १७ व्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी कोणत्या मतदार संघात तीन टप्प्यात मतदान घेण्यात आले?

१) श्रीनगर २) पटियाला ३) कोइम्बतूर ४) अनंतनाग

१३) राज्याच्या 'महाधिवक्त्या' संबंधी खालील विधाने विचारात घ्या :

अ) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश नियुक्त होण्यासाठी जी पात्रता असते ती त्यांच्याकडे असलीच पाहिजे.

ब) ६२ वर्षा वरील व्यक्तिची नेमणूक महाधिवक्ता म्हणून होवू शकत नाही.

क) राज्य विधिमंडळ निश्चित करेल तितके मानधन त्यांना मिळते.

ड) उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाची नेमणूक महाधिवक्ता म्हणून होवू शकते.

वरीलपैकी कोणती विधाने *बरोबर* आहेत ?

१) अ, ब, क २) ब, क, ड ३) अ, क, ड ४) अ, ड

१४) 'तलाक-ए-बिद्दत' २०१८ मुस्लिम महिलांच्या बाबतीत दण्डनीय अपराध (गुन्हा) असून त्यात काय अंतर्भूत आहेत?

अ) 'तलाक-ए-बिद्दत' दण्डनीय (गुन्हा) अपराध असून असे करणाऱ्या व्यक्तीस तीन वर्ष कारावास होईल.

ब) पीडित महिला किंवा नातेवाइकांनी तक्रार अर्ज केल्यास नवऱ्याला अटक करण्याचा अधिकार पोलिसाला राहील.

क) पीडित महिलेची बाजू ऐकल्याशिवाय, मॅजिस्ट्रेट गुन्हेगार पतीला जमानत देऊ शकणार नाही.

ड) हा अध्यादेश सहा महिन्यापर्यंत प्रभावी राहील.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ आणि ब २) फक्त क आणि ड ३) फक्त अ,ब आणि क ४) अ,ब,क आणि ड

१५) खालील विधाने विचारात घ्या :

अ) आपत्ती व्यवस्थापन अधिनियमानुसार सर्व राज्य शासनांनी 'राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' स्थापन करणे अनिवार्य आहे.

ब) 'राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे' अध्यक्ष म्हणून राज्याचे गृहमंत्री कार्य करतात.

क) 'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे' अध्यक्ष म्हणून जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अथवा जिल्हा दंडाधिकारी हे असतात.

वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त?

१) फक्त क २) ब आणि क ३) अ आणि क ४) वरील सर्व

## २) चालू घडामोडी : आर्थिक व वित्त क्षेत्र

१) कर्ज राइट ऑफ करणं आणि कर्जमाफी याच्यातला मुख्य फरक म्हणजे .....

१) कर्ज राइट ऑफ करताना त्या कर्जाची पूर्ण परतफेड रद्द केली जाते.

२) कर्जमाफी करताना त्या कर्जाची पूर्ण वा उर्वरित परतफेड रद्द केली जाते.

३) कर्ज राइट ऑफ करताना त्या कर्जाची उर्वरित परतफेड रद्द केली जाते.

४) कर्जमाफी करताना त्या कर्जाची पूर्ण वा उर्वरित व्याजमाफी केली जाते

२) फ्रँकलिन टेम्पलटन संकट कशासंबंधी आहे ?

अ) शेअरबाजारातील ब्लॅक फ्रायडे ब) ॲकच्युअरीतील घोटाळा क) म्युच्युअल फंडातील लिक्विडिटी

वरीलपैकी कोणते कथन *अयोग्य* आहे ?

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) वरीलपैकी नाही

३) १ मे २०२० या कामगार दिनी वेगवेगळ्या राज्यांमध्ये अडकलेल्या कामगारांना आंतरराज्य प्रवासासाठी श्रमिक ट्रेन सोडण्यात आल्या. त्यातील योग्य रेल्वे गाड्यांचा गट ओळखा –

अ) अलुवा ते भुवनेश्वर ब) नाशिक ते भोपाळ क) जयपूर ते पटना

ड) कोटा ते हटिया इ) लिंगमपल्ली ते हटिया फ) नाशिक ते लखनऊ

**पर्यायी उत्तरे** :

१) अ, ब, क, ड आणि इ २) अ, ब, क, ड आणि फ

३) अ, ब, ड, इ आणि फ ४) अ, ब, क आणि ड

४) प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेबाबत काय खरे *नाही* ?

१) केंद्र सरकारने २०१६ साली पंतप्रधान गरीब कल्याण योजना सुरु केली होती.

२) या योजनेचा हेतू हा देशातील गरिबांना दोन वेळेच अन्न मिळावे हा आहे.

३) सुरुवातीला ही योजना महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांना लागू झाली.

४) लॉकडाऊन काळात या योजनेअंतर्गत ३ महिने मोफत धान्य पुरवठ्याची सोय झाली – १० किलो गहू, १० किलो तांदूळ व १ किलो डाळ.

५) आंतरराष्ट्रीय आर्थिक सेवा केंद्र प्राधिकरण (आयएफएससी) बाबत योग्य विधाने शोधा.

अ) या प्राधिकरणाचे मुख्य कार्यालय गांधीनगर, गुजरात येथे आहे.

ब) आंतरराष्ट्रीय आर्थिक सेवा केंद्र प्राधिकरणाची स्थापना २७ एप्रिल २०२० ला केली गेली.

क) आयएफएससी बँकिंग, भांडवली बाजार आणि विमा क्षेत्रांतील नियामकावर नियंत्रण ठेवते.

ड) हे केंद्र मुंबईच्या बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये प्रस्तावित होते.

**पर्यायी उत्तरे** :

१) अ, ब, क आणि ड २) अ, ब आणि ड

३) अ, क आणि ड ४) ब आणि क

६) भारत सरकार कडून एप्रिल, २०१९ मध्ये खालीलपैकी कोणत्या तीन बँकाचे विलीनीकरण करण्यात आले ?
१) बँक ऑफ बडौदा, पंजाब नॅशनल बँक, कॅनेरा बँक २) पंजाब नॅशनल बँक, देना, सारस्वत बँक
३) विजया बँक, बँक ऑफ म्हैसूर, आंध्रा बँक ४) बँक ऑफ बडौदा, विजया बँक, देना बँक

७) भारतात इलेक्ट्रिक उपक्रम राबविण्यामागे कुठली आव्हाने आहेत?
१) क्रूड तेलाची वाढती आयात–उर्जा सुरक्षा आव्हान
२) प्रदूषण पातळी वाढते आहे–एक पर्यावरण आव्हान
३) वाढती लोकसंख्या–एक अविचल गतिशीलता आव्हान
४) वरीलपैकी सर्व

## ३) चालू घडामोडी : आरोग्य, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्र

१) मे २०२२० मध्ये सीटीआरआयने (क्लिनिकल ट्रायल रजिस्ट्री ऑफ इंडिया) कोरोनावरील कोणत्या औषधाच्या चिकित्सा चाचणीला मंजुरी दिली ?
१) झिंगिविर–एच २) हायड्रोक्झोक्लोरोक्वीन ३) रेमडिसिव्हर ४) आयसोप्रोमाइड

२) खालील विधाने लक्षात घ्या :
अ) 'क' जीवनसत्त्वयुक्त अल्कलाइन अन्नपदार्थ खाल्ले तर प्रतिकारशक्ती वाढते.
ब) श्रेयस आणि प्रेयस आहाराचा समतोल साधण्याकरिता प्रतिदिन अल्कलाइन पदार्थ खायला हवा.
क) पालेभाज्या, फ्लॉवर, ब्रोकोली, पाणभाज्या, कंदमुळं, बदाम हे अल्कलाइन अन्नपदार्थ आहेत.
वरीलपैकी कोणते कथन ***अयोग्य*** आहे ?
**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) वरीलपैकी नाही

३) बोन मॅरो ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया कोणत्या रुग्णांवर केली जाते?
अ) रक्ताचा कर्करोग (ल्युकेमिया) ब) लिम्फोमा (लिम्फॅटिक सिस्टमचा कर्करोग), सेल
क) मायलोमा (प्लाझ्मा पेशींचा कर्करोग) ड) थॅलेसेमिया व अप्लास्टिक ॲनेमिया
इ) न्युरोजेनेटिक आजार
**पर्यायी उत्तरे** :
१) अ, ब, क, ड आणि इ २) ब, क आणि ड
३) अ, ब आणि ड **४) वरील सर्व**

४) इस्रोच्या लघू उपग्रह प्रक्षेपक (एसएसएलव्ही) बाबत काय खरे ***नाही* ?**
ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपकाच्या (पीएसएलव्ही) तुलनेत ....
१) एसएसएलव्हीची उपग्रह वाहून नेण्याची क्षमता कमी म्हणजे ३०० ते ५०० किलोएवढी आहे.
२) एसएसएलव्हीच्या तयारी आणि अंमलबजावणीसाठी लागणारा वेळ चारपटीने कमी आहे.
३) ६०० कर्मचाऱ्याऐवजी एसएसएलव्ही प्रकल्प १० कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन राबविता येतो.
४) एसएसएलव्हीसाठी लागणारा खर्च दहापटीने कमी आहे.

५) रोगजंतूंना दूर ठेवण्यासाठी आरोग्यक्षेत्र, अन्नऔषध उद्योग, कुक्कुटपालन अशा अनेक उद्योगधंद्यांत वापरल्या जाणारी डिसइन्फेक्टंट कोणती ?
अ) ईथाइल अल्कोहोल ब) आयसोप्रोपिल अल्कोहोल
क) बेन्झलकोनिअम क्लोराइड ड) हायड्रोजन पेरॉक्साइड
**पर्यायी उत्तरे** :
१) अ, ब, क आणि ड २) अ, ब आणि क
३) अ, क आणि ड ४) ब आणि क

६) भारतातील कोणत्या घटक राज्यात, जून, २०१९ मध्ये १५० हून जास्त मुलांची चमकी किंवा मेंदूज्वर या आजाराने मृत्यू झालेत ?

१) पश्चिम बंगाल २) उत्तर प्रदेश ३) हरियाणा ४) बिहार

७) ''इनर्जी फार येव्हर'' हा हेतू कोणत्या भारतीय उपक्रमात आहे?

१) भारतीय जैव तंत्रज्ञान विकास २) भारतीय रिनिवेबल उर्जा विकास एजन्सी

३) भारतीय नॉन-रिनिवेबल उर्जा विकास ४) यापैकी नाही

८) अंतराळात भारत आपले स्थानक तयार करणारा जगाचा खालीलपैकी कोणत्या क्रमांकाचा देश होणार आहे ?

१) चौथा २) पाचवा ३) सातवा ४) तिसरा

९) ***अयोग्य*** कथन ओळखा.

१) चंद्रयान-२ चे प्रक्षेपण सतीश धवन अंतराळ केंद्र, श्रीहरीकोटा येथून करण्यात आले.

२) प्रारंभी, इसरोने चंद्रयान-२ करिता रशियासोबत भागीदारी करण्याचे ठरविले होते. २००७ मध्ये दोन्ही देशांनी त्या बाबत करार केला होता.

३) चंद्रयान-२ ऑर्बिटरचा उद्देश होता की, चंद्राला प्रदक्षिणा घालणे आणि त्याच्या पृष्ठभागाची माहिती मिळविणे.

४) चंद्रयान-२ च्या विक्रम लँडरशी संपर्क तुटल्याची निश्चिती इसरोचे संचालक, के. सिवन यांनी सप्टेंबर ९, २०१९ रोजी केली.

## ४) चालू घडामोडी : भौगोलिक व पर्यावरण

१) खालील विधाने विचारात घ्या :

'सिस्टीम ऑफ एअर क्लालिटी वेदर फोरकास्टिंग अँड रिसर्च म्हणजे 'सफर' द्वारे एअर क्वालिटी इंडेक्स काढताना हवेतील या घटकावर भर दिली जातो.

अ) पीएम २.५ कण

ब) नायट्रोजन डायऑक्साइड

क) पीएम १० कण

वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त?

१) फक्त क २) ब आणि क ३) अ आणि क ४) वरील सर्व

२) राज्याच्या 'मावळ भागा' संबंधी खालील विधाने विचारात घ्या :

अ) सह्याद्रीच्या मुख्य मुख्य रांगेचे जे फाटे पूर्व दिशेकडे पसरले आहेत, अशा दोन फाट्याच्या मधल्या प्रदेशाला 'मावळ' म्हणतात.

ब) प्रत्येक मावळातून एक छोटी नदी वहाते आणि त्या नदीच्या नावावरून ते मावळ ओळखले जाते.

क) कृष्णा आणि प्रवरा या दोन नद्यांच्यामध्ये अशी २४ मावळ आहेत.

ड) तानाजी मालुसरे यांच्यावरील पोवाड्यात 'बारा मावळ पुण्याखाली' आणि 'बारा मावळ जुन्नरखाली' असा उल्लेख आहे.

वरीलपैकी कोणती विधाने *बरोबर* आहेत ?

१) अ, ब, क २) ब, क, ड ३) अ, ब, क, ड ४) अ, ड

३) २०११ सालच्या जनगणनेनुसार सर्वाधिक लोकसंख्या असलेली शहरे योग्य उतरत्या क्रमाने लावा-

अ) कल्याण-डोंबिवली ब) वसई-विरार क) औरंगाबाद ड) नवी मुंबई

**पर्यायी उत्तरे :**

१) अ, क, ड , ब २) क, ड, अ, ब, ३) ड, अ, ब, क ४) अ, ब, क, ड

४) एतालिन हा जलविद्युत प्रकल्प .......... खोऱ्यात प्रस्तावित आहे

१) अरुणाचलमधील दिबांग २) कर्नाटकातील अघनाशिनी

३) अरुणाचलमधील सियांग ४) हिमाचल प्रदेशातील रावी

५) खालील विधाने लक्षात घ्या :

अ) २०१९ मध्ये महाराष्ट्रात सर्वात जास्त पाऊस सातारा जिल्ह्यातील ,पाटण तालुक्यातील कोयना विभागातील डोंगरात असलेले गाव पाथरपुंज येथे पडला होता.

ब) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोलीचा अतिजास्त पावसाच्या बाबतीत भारतामध्ये चौथा क्रमांक लागतो.

क) २०१८ मध्ये महाबळेश्वरने चेरापुंजी व मॉसिनराम ह्या ठिकाणांना पावसाच्या बाबतीमध्ये मागे टाकले होते.

वरीलपैकी कोणते कथन *अयोग्य* आहे ?

पर्यायी उत्तरे :

१) फक्त अ  २) फक्त ब  ३) फक्त क  ४) वरीलपैकी नाही

६) युनेस्को वर्ल्ड वॉटर डेव्हलपमेंट अहवालाच्या मते, सर्वाधिक प्रमाणात भूजल उपसण्यामध्ये ...

अ) जगात भारत आघाडीवर असून भारतात दरवर्षी २६० क्युबिक किमी पाण्याचा उपसा केला जातो.

ब) हे प्रमाण चीन व अमेरिका यांच्या एकत्रित उपशापेक्षाही अधिक आहे.

पर्यायी उत्तरे :

१) फक्त अ  २) फक्त ब  ३) अ आणि ब दोन्ही  ४) अ आणि ब दोन्ही नाही

७) खालीलपैकी योग्य विधाने शोधा.

अ) महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर क्षेत्रफळाच्या दृष्टीने सगळ्यात मोठा चंद्रपूर जिल्हा होता

ब) गडचिरोली जिल्हा चंद्रपूरपासून वेगळा झाल्यानंतर महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने सगळ्यात मोठा जिल्हा बनला.

क) जालना जिल्हा औरंगाबाद जिल्ह्यामधून वेगळा करण्यापूर्वी औरंगाबाद जिल्हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकावरचा जिल्हा होता.

**पर्यायी उत्तरे :**

१) ब, क  २) अ, ब आणि क  ३) अ, ब  ४) ब आणि क

८) लडाख बाबत योग्य विधाने शोधा.

अ)लडाख मध्ये लेह आणि कारगील असे दोन जिल्हे आहेत.

ब) लामांचे मुखवटा नृत्य या भागात प्रसिद्ध आहे.

क)लामायुरू मानेस्ट्री/धर्मशाळा तेथील चंद्रासारख्या पृष्ठभूमीसाठी प्रसिद्ध आहे.

ड) लामायुरूची स्थापना दलाई लामा यांनी केली आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) अ, ब, क आणि ड  २) अ, ब आणि क

३) अ, क आणि ड  ४) ब आणि क

९) नानकानासाहिब बाबत योग्य विधान शोधा.

अ) त्याचे पूर्वीचे नाव तलवंडी होते.

ब) राय बुलर भट्टी यांनी या शहराचे नामकरण 'नानकाना साहिब' असे केले.

क) ब्रिटिश काळात या गुरुद्वारामध्ये झालेल्या हिंसक हल्ल्यातून गुरुद्वारा सुधारणा चळवळीत मैलाचा दगड मानले जाते.

ड) महाराजा रणजीत सिंह यांनी येथील जन्मस्थान समाधी देवस्थानाचे बांधकाम केले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) अ, ब, क आणि ड  २) अ, ब आणि क  ३) अ, क आणि ड  ४) अ आणि ड

१०) खालील बहु-उद्देशिय प्रकल्पांच्या जोड्या लावाः

| कॉलम *I प्रकल्प* | कॉलम *II नदी* |
|---|---|
| अ) काँग सबती | i. बराकर |
| ब) टेहरी डॅम | ii. सुवर्णरेखा |
| क) मैथॉन डॅम | iii. अजय |
| ड) मयुराक्षी | iv. भागीरथी |

पर्यायी उत्तरे :

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| १) | ii | iv | i | iii |
| २) | iv | ii | i | iii |
| ३) | iiv | ii | iii | i |
| ४) | i | iii | iv | ii |

११) जोड्या लावा :

| कॉलम *I ठिकाणे* | कॉलम *II विशेष* |
|---|---|
| अ) खंबायतचे आखात | i. खचलेला किनारा |
| ब) कोकण किनारा | ii. अरुंद आणि सरळ किनारा |
| क) काकीनाडा | iii. जुने संचयन |
| ड) पाल्कचा उपसागर | iv. पर्ल फिशींग |

पर्यायी उत्तरे :

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| १) | iii | i | iv | ii |
| २) | iii | i | ii | iv |
| ३) | i | iii | ii | iv |
| ४) | iv | ii | iii | i |

१२) जगातील पहिले १००% सौर उर्जेवर चालणारे विमानतळ ...... येथे आहे.

१) कोचीन, केरळ   २) बंगलुरु, कर्नाटक   ३) चेन्नई, तामिळनाडू   ४) मुंबई महाराष्ट्र

## ५) चालू घडामोडी : सामाजिक, शैक्षणिक व ऐतिहासिक घटना

१) खालील विधाने लक्षात घ्या :

अ) मराठीत विरामचिन्हांचा वापर त्यांच्यामुळे सुरु झाला.

ब) २६ फेब्रुवारी १८७७ रोजी महाबळेश्वरच्या माल्कम पेठमध्ये त्यांचा मृत्यू झाला.झाला

क) इंग्रजी-मराठी शब्दकोशासाठी त्यांनी ६० हजारांच्यावर मराठी शब्दांना पर्यायी इंग्रजी शब्द शोधले.

वरील विधानात कोणाचे वर्णन आहे ?

**पर्यायी उत्तरे :**

१) मोल्सवर्थ   २) ग्रँट डफ   ३) लॉर्ड एलफिन्स्टन   ४) मेजर थॉमस कँडी

२) ***योग्य*** कथन/ने ओळखा.

अ) डॉ. होमी भाभा क्लस्टर विद्यापीठ मुंबई येथे स्थापन करण्यात आले.

ब) राष्ट्रीय विधि विद्यापीठ नागपूर, औरंगाबाद आणि मुंबई येथे सुरू होत आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ   २) फक्त ब   ३) अ आणि ब दोन्ही   ४) अ आणि ब दोन्ही नाही

## ६) चालू घडामोडी : क्रीडा क्षेत्र

३) जोड्या जुळवा (अर्जुन पुरस्कार २०१९ बाबत):

| खेळाडू | खेळाचा प्रकार |
|---|---|
| अ) तेजिंदरपाल सिंग तूर | i) फूटबॉल |
| ब) अजय ठाकूर | ii) टेबल टेनिस |
| क) हरमित राजूल देसाई | iii) कबड्डी |
| ड) गुरप्रित सिंग संधू | iv) ॲथलेटिक्स |

पर्यायी उत्तरे :

| अ | ब | क | ड |
|---|---|---|---|
| १) iv | ii | iii | i |
| २) i | iii | ii | iv |
| ३) i | iv | iii | ii |
| ४) iv | iii | ii | i |

४) खालीलपैकी कोणत्या क्रिकेटपटूला 'राजीव गांधी खेल रत्न पुरस्कार, २०१८' ने सन्मानित करण्यात आले?
१) विराट कोहली २) रोहित शर्मा ३) जसप्रीत बुमराह ४) महेंद्र सिंह धोनी

५) २०१९ मध्ये 'फीफा' (FIFA) च्या कार्यकारिणी समितीसाठी सदस्य म्हणून निवड झालेले पहिले भारतीय व्यक्ती कोण आहेत ?
१) अरुण जेटली २) प्रफुल्ल पटेल ३) राजीव प्रताप रुडी ४) कपिल सिब्बल

## ७) पुस्तके, कला व दिनविशेष

१) कोरोनासारख्या साथीची भीषणता ....... या कादंबरीने आधीच दाखवून दिली आहे.
१) अमिताव घोष यांची 'द सर्कल ऑफ रीझन'
२) अरुण कोल्हटकर यांची 'कोमा'
३) रोबिन कूक यांची कोन्तेजिओन
४) यापैकी नाही

२) उत्तम बंडू तुपे यांनी लिहिलेली पुस्तके शोधा.
अ) माती आणि माणस ब) आंदण क) भस्म ड) कोंबारा इ) झुलवा
पर्यायी उत्तरे :
१) अ, ब, क, ड आणि इ २) ब, क आणि ड
३) अ, ब आणि ड ४) अ आणि ड

३) हा दिवस निर्भया न्याय दिवस म्हणून लक्षात ठेवला जातो,
१) २० मे २) २० एप्रिल ३) २२ मार्च ४) २० मार्च

४) कोणत्या कवीच्या 'आई' या कवितेतल्या प्रारंभीच्या ओळी या 'स्वामी तिन्ही जगाचा। आई विना भिकारी।' अशा आहेत ?
१) साने गुरुजींच्या श्यामची आई २) माधव ज्युलियन यांच्या प्रेम स्वरुप आई
३) कवी यशवंतांच्या आई ४) यापैकी नाही

५) प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ इमॅन्यूएल वॉलरस्टीन इतक्यात बातम्यामध्ये होते. त्यांनी कोणते ग्रंथ लिहिले आहेत ?

अ) 'द कॅपिटॅलिस्ट वर्ल्ड-इकॉनॉमी' ब) 'हिस्टॉरीकल कॅपिटॅलीझम'

क) 'द वर्ल्ड इज आऊट ऑफ जॉईन्ट' ड) ' द फेस बिहाईंड द मास्क'

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ,ब आणि क २) फक्त ब,क आणि ड ३) फक्त अ,ब आणि ड ४) फक्त अ,क आणि ड

६) फादर दिब्रिटो यांनी कोणते ग्रंथ लिहिले आहेत ?

अ) 'तेजाची पावले' ब) 'सृजनाचा मोहोर' क) 'सुवार्ता' ड) 'आनंदाचे अंतरंग-मदर टेरेसा'

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ,ब आणि क २) फक्त अ,ब आणि ड ३) फक्त ब,क आणि ड ४) फक्त अ,क आणि ड

७) डॉ. अभिजीत बॅनर्जी यांनी लिहिलेली पुस्तके शोधा.

अ) मेकिंग एड वर्क ब) व्हॉट द इकॉनामी नीड्स नाऊ

क) डेव्हलपमेंट ॲज फ्रीडम ड) पुअर इकोनॉमिक्स

इ) द आयडिया ऑफ जस्टिस

**पर्यायी उत्तरे** :

१) अ, ब, क, ड आणि इ २) ब, क आणि ड

३) अ, ब आणि ड ४) अ आणि ड

८) 'जागतिक तंबाखूविरोधी दिन' कोणत्या दिवशी साजरा केला जातो?

१) ३० जून २) ३१ मार्च ३) ३० मे ४) ३१ मे

## ८) नेमणुका व व्यक्तीविशेष

१) मुंबई प्रांत ते महाराष्ट्र निर्मिती दरम्यान्च्या राज्यपालांचा योग्य क्रम लावा-

अ) राजा महाराज सिंह

ब) सर गिरिजा शंकर बाजपेयी

क) हरेकृष्ण मेहताब

ड) श्री प्रकाश

**पर्यायी उत्तरे :**

१) अ, क, ड, ब २) क, ड, अ, ब, ३) ड, अ, ब, क ४) अ, ब, क, ड

२) बॉलिवूड अभिनेता इरफान खान यांचे २९ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्याबाबत खालीलपैकी कोणते विधान *चुकीचे* आहे?

१) २०११ मध्ये भारत सरकारच्या वतीने 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

२) लंडनच्या एका दिग्दर्शकाने त्यांना 'द वॉरिअर' या चित्रपटात मुख्य भूमिका दिली होती.

३) 'हैदर' या सिनेमासाठी इरफानला सर्वोत्कृष्ट खलनायकाचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला होता.

४) पान सिंग तोमर या सिनेमासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

३) जोड्या लावा (नवनियुक्त राज्यपाल) :

| *'अ' (नाव)* | *'ब' (राज्य)* |
|---|---|
| अ) कलराज मिश्र | i) तेलंगणा |
| ब) बंडारु दत्तात्रय | ii) केरळ |
| क) अरीफ मोहम्मद खान | iii) हिमाचल प्रदेश |
| ड) तमिलीसाई सौंदराराजन | iv) राजस्थान |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | iv | ii | i | iii |
| २) | ii | iv | iii | i |
| ३) | iv | iii | i | ii |
| ४) | iv | iii | ii | i |

४) मुख्य न्यायाधीश रंजन गोगोई यांच्या विरुद्ध यौन उत्पीडन वादा बाबत समिती गठीत करण्यात आली होती, त्याचे अध्यक्ष कोण होते ?

१) न्यायाधीश एन. व्ही. रमण
२) न्यायाधीश दीपक मिश्रा
३) न्यायाधीश इंदिरा बॅनर्जी
४) न्यायाधीश एस. ए. बोबडे

५) 'चिफ ऑफ डिफेन्स स्टाफ' (CDS) (भारत) बाबत खालीलपैकी कोणते विधान *चुकीचे* आहे?

१) सी.डी.एस.चे वर्णन सेवेतील प्रमुखांमध्ये 'समानातील प्रमुख' असे केले जाते.
२) सी.डी.एस. हे सेना व्यवहार विभागाचे (Department of Military Affairs) प्रमुख आहे.
३) सी.डी.एस. हे पद 'माहिती अधिकार कायद्याखाली' येणार नाही.
४) सी.डी.एस. यांचे वेतन आणि भत्ते हे सेवेतील प्रमुखांच्या इतके असेल.

६) डॉ. कोलातुर गोपालन हे इतक्यात बातम्यामध्ये होते. त्यांच्याबाबत काय खरे *नाही* ?

१) ते राष्ट्रीय पोषण संस्थेचे पहिले संचालक होते.
२) ते 'न्यूट्रिशन फाउंडेशन ऑफ इंडिया' चे संस्थापक होते.
३) त्यांना १९७० मध्ये पद्मश्री ने सन्मानित करण्यात आले.
४) त्यांना २००५ मध्ये पद्मभूषण ने सन्मानित करण्यात आले.

## ९) पुरस्कार व बहुमान

१) खालील विधाने लक्षात घ्या :

अ) २०१९ चे शरीरशास्त्र किंवा वैद्यशास्त्राचे नोबेल पारितोषिक दोन अमेरिकन व एक ब्रिटिश शास्त्रज्ञांनी मिळविले.

ब) शरीरातील ऑक्सिजनच्या प्रमाणाची पातळी ओळखून त्याला प्रतिसाद देण्याचे पेशींचे कार्य कसे चालते, हे सिद्ध करुन कर्करोग, रक्ताक्षयासह अनेक आजारांशी लढण्याचा नवा मार्ग दाखविण्यासाठी नोबेल पारितोषिक देण्यात आले.

क) विलियम जी. केलिन, ज्युनियर हे ब्रिटिश शास्त्रज्ञ आहे.

वरीलपैकी कोणते कथन ***अयोग्य*** आहे ?

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ  २) फक्त ब  ३) फक्त क  ४) वरीलपैकी नाही

२) ***योग्य*** कथन/ने ओळखा.

अ) २०१९ मध्ये भारताकडून ऑस्कर पुरस्कारासाठी 'गली बॉय' चे नामांकन करण्यात आले.

ब) २०१८ मध्ये भारताकडून ऑस्कर पुरस्कारासाठी 'व्हिलेज रॉकस्टार्स' चे नामांकन करण्यात आले होते.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ  २) फक्त ब  ३) अ आणि ब दोन्ही  ४) अ आणि ब दोन्ही नाही

३) अमिताभ बच्चन इतक्यात बातम्यामध्ये होते. त्यांना प्रतिष्ठित दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांच्याबाबत काय खरे *नाही* ?

१) त्यांना १९९४ मध्ये पद्मश्री ने सन्मानित करण्यात आले.

२) त्यांना २००१ मध्ये पद्मभूषण ने सन्मानित करण्यात आले.

३) त्यांना २०१५ मध्ये पद्मविभूषण ने सन्मानित करण्यात आले.

४) ते चित्रपट निर्माता आणि पार्श्वगायक सुद्धा आहे.

४) अमेरिकन पत्रिका 'द टाईम' ने प्रकाशित केलेल्या 'जगातील सर्वात प्रभावशाली व्यक्ती, २०१९' मध्ये ज्यांची नावे सामील आहेत, अशा तीन व्यक्ती कोणत्या आहेत ?

अ) नरेंद्र मोदी ब) मुकेश अंबानी क) अरुंधती काटजू ड) मेनका गुरुस्वाती

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ,ब आणि क २) फक्त अ,ब आणि ड ३) फक्त अ,क आणि ड ४) फक्त ब,क आणि ड

५) *अयोग्य* कथन ओळखा.

१) अखिल भारतीय स्वच्छ सुंदर शौचालय स्पर्धा २०१९ मध्ये कोल्हापूर ने दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त केला.

२) स्वच्छ सुंदर शौचालय स्पर्धा २०१९ मध्ये महाराष्ट्राला एकंदरीत दुसरे स्थान प्राप्त झाले.

३) स्वच्छ भारत ग्रामीण सर्वेक्षण २०१६ मध्ये राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट १० जिल्ह्यामध्ये महाराष्ट्राचे पाच जिल्हे होते.

४) स्वच्छ भारत सर्वेक्षण २०१६ मध्ये सिंधुदुर्गला भारतातील उत्कृष्ट जिल्हा घोषित करण्यात आले.

## १०) सामान्यज्ञान

१) महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद सर्वात कमी काळासाठी खालीलपैकी कोणी भूषविले ?

१) देवेन्द्र फडणवीस २) पी. के. सावंत ३) बाळासाहेब खेर ४) मारोतराव कन्नमवार

२) भारतात कोविड–१९ चा रूग्ण सर्वप्रथम कोठे आढळला

१) महाराष्ट्र २) दिल्ली ३) केरळ

४) गुजरात

.

## उत्तरे

### १) चालू घडामोडी : राजकीय क्षेत्र व प्रशासन

१–४ २–२ ३–३ ४–३ ५–४ ६–३ ७–४ ८–१ ९–३ १०–३

११–१ १२–४ १३–४ १४–४ १५–३

### २) चालू घडामोडी : आर्थिक व वित्त क्षेत्र

१–२ २–३ ३–१ ४–३ ५–२ ६–४ ७–४

### ३) चालू घडामोडी : आरोग्य, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्र

१–१ २–४ ३–४ ४–४ ५–१ ६–२ ७–२ ८–२ ९–४

### ४) चालू घडामोडी : भौगोलिक व पर्यावरण

१–४ २–३ ३–४ ४–१ ५–४ ६–४ ७–२ ८–२ ९–४

### ५) चालू घडामोडी : सामाजिक, शैक्षणिक व ऐतिहासिक घटना

१–४ २–३

### ६) चालू घडामोडी : क्रीडा क्षेत्र

१–३ २–१ ३–२

### ७) पुस्तके, कला व दिनविशेष

१– २– ३– ४– ५– ६– ७– ८– ९– १०–

११– १२– १३– १४– १५–

### ८) नेमणुका व व्यक्तीविशेष

१–४ २–३ ३–४ ४–४ ५–३ ६–४

### ९) पुरस्कार व बहुमान

१–३ २–३ ३–१ ४–४ ५–२

### १०) सामान्यज्ञान

१–१ २–३